# तिसरा रस्ता

सुधाकर शं. देशपांडे



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७३६

REFBK-0023374
REFBK-0023374

पाणी गेले बारा वाटा
हसू आले रित्या काठा

२०३६
२३३७४
२५।१२।७

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ अनुदान पुरस्कृत.

# तिसरा रस्ता

REFBK-0023374
REFBK-0023374

सुधाकर शं. देशपांडे

जागर प्रकाशन

© सुधाकर शं. देशपांडे

जागर प्रकाशन : ५

प्रकाशक : रमेश कुवल,
जागर प्रकाशन,
१४/११२, उन्नत नगर नं. ४,
गोरेगाव (प)., मुं. ४०० ०६२.

प्रथमावृत्ती
मार्च १९८१

मुद्रक : जयसेन पाटील,
जयभवानी प्रिंटींग प्रेस,
उरणकरवाडी,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

मूल्य : सात रुपये

## तिसरा रस्ता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७३६
२३३५७
काव्य २५१/सं

केशव शंकर देशपांडे ( आबासाहेब )
यांस

## कवितानुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| विरघळणाऱ्या वेळी | ५ | तीन वर्तुळे | २९ |
| दुपार | ६ | हे भास चंदनाचे | ३० |
| रेशीम बनांत | ७ | मुळे उन्मळावी | ३१ |
| वळले घन | ८ | मिनार | ३२ |
| सृजन | ९ | द्वंद्व | ३३ |
| चाहूल | १० | आठवणी | ३४ |
| उन्ह | ११ | पृथ्वीस भारभूत | ३५ |
| अबोली | १२ | जन्मजड | ३६ |
| आरती डोळां करी | १३ | अेक दिवस | ३७ |
| अजुन असा | १४ | पाणी | ३८ |
| तप | १५ | सत्त्वहरण | ३९ |
| मी अलक्त लावतो | १६ | शोध | ४० |
| शपथ | १७ | माझ्यात मी दूर दूर ! | ४१ |
| प्रतिभा | १८ | विफल | ४२ |
| गारूड | १९ | एक कुणी | ४३ |
| डोळशांची वाट चुकते | २० | वय | ४४ |
| शापातून प्रवास | २१ | क्षमा | ४५ |
| शाप | २२ | भय | ४६ |
| सामोरी | २३ | बाधा | ४७ |
| एक लोककथा | २४ | प्रतिबिंब | ४८ |
| हा क्षण | २५ | दुःख | ५० |
| वाण | २६ | वासना | ५१ |
| रसायन | २७ | हे गाव | ५२ |
| बंदी | २७ | आत्मा | ५४ |
| या व्यर्थाची मिठि मानेवर | २८ | आभाळ पांघरावे | ५५ |
| | | तिसरा रस्ता | ५६ |

# विरघळणाऱ्या वेळीं

मयसभेंत या शब्दांच्या
मी घसरत गेलों आहे
डोहांत निळ्याशा भोळ्या
मी फुलांत भिजलो आहे

मी जावळ आकाशाचे
श्वासांत हुंगले आहे
ओढून उराशी वेली
मी थरथर ल्यालों आहे

मी चंद्र उमलतो जेथें
तें क्षितीज प्यालों आहे
या विरघळणाऱ्या वेळीं
स्वप्नांत हरवलो आहे

## दुपार

आठवणींचा हिरवा झुबका
भूतकाळचे तळे
पाउल गोरे दुपार न्हाती
जळामधे खळबळे.

पंख झटकुनि भान बैसते
कलत्या स्वप्नांवर
वाट निसरडी उतरुन तेथिल
पीते जळ अंबर !

## रेशीमबनांत

कोवळा पाऊस झिमझिमला
उन्हाच्या टाळूवर
झाडांची माया झुले
मध्यमवयीन खिडकीवर
हिरवळीला झाली
रंगीबेरंगी चिमणी फुलें
विश्व झालें आतां
ठिबक ठिबकणारें मधाचें पोळें
फूलपंखी पाखरु झालें
मन गेलें दूर दूर
उन्हात....पावसात....रेशीमबनांत
चोहोंकडे माझाच पूर

## वळले घन

वळले घन गगन गगन
फुलले मन्न उपवन
पालवीत पक्षि दडे
सुदूर कुठे भान उडे

धारांच्या रेशिमबनी
तृणपाते लपत छपत
धरणीची नाभि आज
कस्तुरिचे कण उधळत

मी साक्षी....तू साक्षी
जुळले घन जुळले मन
गगन झुके पृथ्वीवर
भिजले मन भिजले तन !

## सृजन

असा चंद्रपान्हा मुखी ओघळावा
मनी मेघ तान्हा तरंगोनि जावा
फुले चांदण्यांची कपाळी झुलावी
डहाळीस हिरवी पाने फुटावी

## चाहूल

तुझी चाहूल लागली
मनातली झाडे सळसळली
पाणी निथळत

दव पायाखाली
गोड गारवा पसरीत गेले
काळोखातून पहाटे
प्रकाशकारंजे उचंबळले

मोरपिसांचे मुकूट
मनातले गोपाळ ल्याले
मुरलीचे उंच उंच स्वर
गात्रात चढत राहिले

तुझी चाहूल लागली
मनात गोकुळ गजबजले
एकाएकी मनाला
कोवळे धुमारे फुटले

**मीच तो मय शिल्पी**

निळ्या अथांग अर्थडोही
खपुष्पांच्या वर्षावात मी भिजतोय
पृथ्वीवरल्या आदिम
औषधी वेलीचे चैतन्यडोळे मला लाभलेत
डोळयांनी त्या
मी पहिली पौर्णिमा भोगतोय.
कुठेतरी साठवले कधीसे आठवले
ते सांगताना काय मिसळले ?
मिसळताना काय घडले ?
त्याचीच ही मयसभा
पंचसंवेदनामरगजस्तंभांनी झकाकणारी
अलौकिकाच्या तिसऱ्या वाटेचा वाटसरू
मीच तो मय शिल्पी
एरव्ही मी हा असा लौकिक
तुमच्यासारखा आहार विहार करणारा
व्यवहारात चकणारा चुकणारा
पण एका अद्‌भुत क्षणी होतो
त्या चकण्या चुकण्याच्या दगडविटांचा
हा महाल भुरळ पाडणारा.

## चाहूल

तुझी चाहूल लागली
मनातली झाडे सळसळली
पाणी निथळत

दव पायाखाली
गोड गारवा पसरीत गेले
काळोखातून पहाटे
प्रकाशकारंजे उचंबळले

मोरपिसांचे मुकूट
मनातले गोपाळ ल्याले
मुरलीचे उंच उंच स्वर
गात्रात चढत राहिले

तुझी चाहूल लागली
मनात गोकुळ गजबजले
एकाएकी मनाला
कोवळे धुमारे फुटले

## उन्ह

सुरूच्या झाडाचे बन पाहताना
चढउतारांची हिरवी वाट
तुडवीत आलीस कातीव स्तन मिरवीत
तुला पाहून मन भरकटले
आभाळात ढग भरकटावा तसे
आणि हसलो लाजून
कशाची लाज वाटली हे जाणून
वळणावर वळताना गिरकी घेऊन
तू पाहिलेस कुतुहलाने
आणि शेवंतीचा रस ओघळावा
तसे उन्ह ओघळले अंतर्मनात

## अबोली

अबोलिची वेणी तुझी
अबोल ग बोली
बोल बोल बोलताना
गाभुळत गालीं
गंध गंध सुखावता
डंख दुखावतो
चंद्र चंद्र पिळलेला
ओठ अबोलतो
अबोल ग डोळे तुझे
ऐट बोलकिशी
अबोलिच्या अंगणी तू
स्वप्नें हालविशी !

## आरती डोळां करी

चंद्र आहे सोबतीला संगतीला
वाट आहे वाकडी चित्तापरी
झाडी हिरवी गर्द भंवती धुंदावता
काजवा तेजाळतो देहोमींसा

अभ्र तरते गौर क्षितिजी
मी उभा तेजाळ तू दिग्मूढ का ?
मीच झालो चंद्र इथला
आरती डोळां करी तू भ्रांत का ?

## अजुन असा

अजुन असा श्वासावर झुलतो
रात्रजुईचा गंधित काटा
गर्द कृष्ण तव डोळ्यामधला
अबोल दृष्टी निळसर ताठा.
सात गजांचे सात पहारे
चुकवित पक्षी गाणे गातो
ओठावरचा एक शहारा
चुंबनवेडा वितळत जातो.
चित्र स्मृतींचे वर्तुळ होते
जिथुन निघावे तेथे येते
हळद व्यथेची अंगा लाऊन
रात्र मनांतिल गौर पूजिते !

## तप

कसा असा हा ओठा डसला
अवचित गोविंद
पिकी जांभुळे लगड लगडली राघू बेबंद
अंगांगावर स्वेद डबडबे धुळीत पिळली फुले
खळाळत्या ओढ्याने नेले फेडून साडीस पुढे
त्यात गोकुळी गर्द केतकी फुसांडती साप
' त्वमेव भर्ता ' मिठीत वदता पापाचे हो तप

## मी अलक्त लावतो

विकलगात्र भग्नरात्र लिखितचित्र मी उभा
अनिर्बंध नित्य धुंद अेक छंद भोवरा !

झुकत धुके भास फुके चुकत कुठे कळेचिना,
व्यर्थ असे प्राप्त पिसे अजुनि कसे खिरेचिना !

लक्ष वेळ फुटत भाळ स्वप्नचूळ टाकतो,
ऊष्ण रक्त तू विरक्त मी अलक्त लावतो !

प्रेमपीठ अजुनि वीट वाळवंट धुंडतो,
खोल बुडत मृगजळात अश्रु पीत हासतो !

मी त्रिकाळ अेक टाळ भूतकाळ वाजवी
शब्द भिजे स्पर्श तुझे मनी रुजे पालवी !

तुझ्या खुणा नित्य पुन्हा क्षणोक्षणा जागवी,
येअि निकट हृदयोत्कट ! विरहवाट संपवी !

## शपथ

का शपथ अशा अश्रुंची
जाओच्या वेलिस बाधे
प्रश्नेस असे गुरफटती
हे हिरवे गोंडस धागे.

हृदयात बोचतो काटा
वाटेस सोयरा वृक्ष
पालखीत फांद्यावरूनी
हळु लाल उतरतो चंद्र

## प्रतिभा

आभाळाच्या छातीवर
टेकला होता तिने माथा
झाडांचा दबता श्वास
श्वासात मिसळला होता तिच्या
मेघांचे आषाढी काजळ
रंग रेखीत होते तिच्या लांब डोळ्यांत
कोवळ्या उन्हाची काचोळी
सावरीत होती ऐवज तिचा
तिच्या कृश कटीला बिलगली
बलाकमालेची मेखला
स्वप्नांचा कासोटा निसटला होता थोडा
पहावे तेव्हा अशी कामार्त सुस्त
धुंदफुंद अस्ताव्यस्त
आभाळ सोडते सावल्यांचे पडदे
पडद्याआड युगानुयुगे
माझ्यात तिचा—तिच्यात माझा
डोळ्यांत डोळा कधीचा जळे.

## गारूड

यापुढे
वाटा वळत वळताहेत
सर्पिणी
वळवळणाऱ्या
क्षणाआधीच
गारोड्यावर गारूड झाले
तुझ्या वारूळाचे
आता डोलत राहणे हेच उरले
आयुष्यभर.

## डोळसांची वाट चुकते

एवढा हा जन्म आहे
छळुन तू बांधून घे
पापण्या मिटतील तेंव्हा
मुक्त मज सोडून दे.

यौवनातिल स्वप्न माझे
तूच राणी जाळिले
राख मी फासूनिया
थडग्यात लेणे कोरिले

कोसळे अंधार येथे
मी उभा अजुनी कसा ?
डोळसांची वाट चुकते
काय हा रस्ता असा ?

## शापातून प्रवास

ओठांवरती थेंब चांदणे
आषाढातिल रात्र
फुलाफुलांनी मला जखडिले
ऐसा मी परतंत्र
कुठे कुणास्तव जीव उजळतो
दवात भिजली वाट
रुपास लाजून तुझ्या थबकते
अंधारात पहाट
पंख अधूरे उडे पाखरू
एकलकोंडे श्वास
फुटलेले हे ऊर चालला
शापातून प्रवास

## शाप

मी तुला म्हटले कितीदा भेटून जा
आणि माझ्या वेदनेला छेद तूं देऊन जा
कां असे धागे तुटावे जोडण्याआधीच अपुले
रेशमी नाते विरावे गुंफण्याआधीच अपुले
हे मला कैसे कळावे काय कोठे चुकत गेले
स्वप्न हे माझ्या मनींचे कोळसे होऊन गेले !
काय होता भोग भाळीं वेदनेचा संचिताच्या
दूर झाल्या वेगळाल्या आपुल्या वाटा सदाच्या
दाटला अंधार भंवती दुःख मी सोसू कसे ?
शाप हा होता कुणाचा जळत मी जगणे असे

## सामोरी

मला वाटते जपत रहावी
खूण तुझी काळोखाघरची
उलटसुलट खळबळून धूती
वस्त्रे माझ्या बुबुळावरती
मौनामधुनी सरपटणारे
खोल हुंदके मी ठेचावे
बुभुक्षिताचे जसे आतडे
पिळवटणारे तसे हंसावे
धामण होऊन या वाटेवर
हजार वळसे वळणे घ्यावी
काय डंख की दर वळणावर
तूच मला सामोरी यावी !

## एक लोककथा

एक लोककथा
मी एकदा लक्ष्यपूर्वक ऐकली
गंगा दुथडी वहात असता
एक पक्षी
तृषार्त
गंगेवर सारखा भिरभिरत असतो
पण पीत नाही पाणी
येतच नाही पीता
फक्त डोळ्यात साठवतो
त्या कल्लोलिनीचे
शीतल, खोल
पाणी....पाणी....पाणी
पाण्याबाहेर राहून पाण्यात बुडालेला
प्रतिबिंबरुपाने बाहेर उडणारा
तो पक्षी माझ्यात
मी त्याच्यात बुडालेला

## हा क्षण

आता आपल्यामधून वहात गेले पाणी अनंत जन्माचे
एका क्षणात
हा क्षण अणुस्फोटक
साऱ्या भूत–भविष्य विश्वाला जळतेपणी विभागणारा
जे नव्हते तेच होते आणि आहे तेच नव्हते
असे घडविणारा
प्रौढ परिणतप्रज्ञ वड पारंब्यासह खोलवर उन्मळणारा
कसा बर्फगार झोंबणारा स्पर्श भ्रूमध्यावर
ठिबकत्या दुःखाचा
रित्या डेऱ्यात एकठाय एकलय वाजत्या पर्जन्य सूक्ताचा
वेड्या वाकड्या रस्त्यावर धावणाऱ्या
दुःस्वप्नकबंधांच्या पावलांचा
हा क्षणच विश्वरूपदर्शन घडवणारा
नव्या पार्थाच्या सृजनाचा
आता इकडे तिकडे इथे तिथे समोरासमोर तू मी मध्ये
हा क्षण.

## वाण

एक पक्षी
विध्द वक्षी
जाळिदार नक्षी
कोरित राहिला

नक्षी देखुन
भान हरपुन
उरी फुटुन
रोज मेला.

## रसायन

असा गहन झालो
रात्र कोळून प्यालो
गर्द अंधार पीता
मी तुम्हा विसरून गेलो !

## बंदी

मी अंधाराच्या जाळ्यात गुरफटलेला
रात्रीचा बंदी
नक्षत्राचे खडे बोचून
बुबुळे झालीत जायबंदी
पुनः पुनः येऊ नये तेथे येतो
प्रार्थनेत प्राण नसतो
माझ्या वाळवंटात
झाडझुडुप दिसत नसते
उकडणाऱ्या अंधारात
श्वास मेंदु भाजत असतो
उष्ण अंधारात धडपडत
मी श्वास मोजत असतो !

## या व्यर्थाची मिठि मानेवर

या व्यर्थाची मिठि मानेवर
फास तयाचा नित्य लागतो
डोळ्यांवरच्या ग्लानीला अन्
नित्य जयाचा ध्यास लागतो

अगम्यतेची चाहुल याला
सदैव कोठुन लागत असते
मरगळलेल्या अशा वृत्तिला
स्वप्नांची कुबडीही असते

धुके दाटते वास्तव खिरते
आकाराला काही येते
आशाच्या काफल्यात तेव्हा
विचार हरवुन स्वत्व थबकते

रोजच असले सदैव घडते
झिंज्या झाडित बुद्धी रडते
या व्यर्थाची मिठि मानेवर
परंतु अपुली कायम असते !

## तीन वर्तुळे

तेव्हां आव्हान देणारे
फुटक्या गलबतातिल मला
दिसत होते सारखे
क्षितिजाचे लांबच लांब वर्तुळ !

आता दाखविते मला
मीपणाच्या खुज्या त्रिज्या
फेंगड्या पायाखालचे
मातीतिल कोंडीचे गोल वर्तुळ !

आणि मोजतात
धुमसून थंड होणारे
दोन वर्तुळांतील अफाट अंतर
डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळे !

## हे भास चंदनाचे

हे भास चंदनाचे
हे श्वास चांदण्याचे
भारावल्या मनाचे
हे धूप यौवनाचे
काळोख चाटणाऱ्या
हरल्या खुळ्या स्वराला
विझता मनात ज्वाळा
जडतो उदास चाळा
हे तो फुके जिणे जे
नक्षीत पापणीच्या
शेवाळता स्मृतीने
जगतो कशास नकळे
टिकटीक या उराची
जोंजावतो विषण्ण
भरल्या उरास गिरवी
बाराखडी अजून !

## मुळे उन्मळावी

मुळे उन्मळावी दुपारी मनाची
अशी एकटी आग वैराणते
तुझा कापुरी श्वास ती वाफ वेची
असे झाड हिरवे उभे पेटते
मला ज्ञात की संत सांगून गेले
जगी चक्रवर्ती सदा यातना
मुक्या मी मला विस्तवी झोकलेले
त्वचेची जळे दुःखसंवेदना
इथे संचिताचा अमर्याद तोरा
इथे या निशा नित्य चंद्राविना
तरी भोवती व्यर्थ साचे पसारा
कळेना कुठे असा वाहतोना

## मिनार

मी मातीतुन मिनार रचले
झगमगणाऱ्या वांछितांचे
दिवास्वप्न दैनिक घडविले
अतृप्तीच्या चिऱ्याचिऱ्यांचे

नक्षत्रांचे स्वप्नहिमालय
तळी वितीचे वारूळ माझे
सरपटणारी दृष्टी तमोमय
रात्र अमेची अवघड ओझे

मी संज्ञेच्या कबरी तोडून
भ्रमिष्ट असला सौदा केला
फुटले दर्पण तुकडे खळ्कन
मी मातीतुन मिनार रचला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४३६
२३३८४
काव्य २५।१२।५९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## द्वंद्व

सोयरे झालेत डोळे
झड लागलेल्या अंधारपावसात
दिवसास चंद्र लहडावा वृथा
रात्री विधवेप्रमाणे चिरउपेक्षित
रडतात भिजवीत उशा
सागरात कोसळणाऱ्या पर्जन्याप्रमाणे
कोणी सुखी...अतिसुखी
मी वाळवंट तुडवणारा आफ्रिकेत
आणि प्रत्यक्षाचे भासाशी द्वंद्व
फक्त घोष कानठळ्यांचा होता
सारेच आप्त अनाप्त
मी हा असा आंधळा चिरसंतप्त !

## आठवणी

स्मशानभूमीजवळून जाताना
आठवणी
चंद्र सोबत याव्या तशा

वर्तमानाच्या पिंपळपारापाशी
पाताळगंगा
पावलांखाली यावी तशा

कलेवराच्या चेहऱ्यावर
थंड
चिताप्रकाश थरथरतो तशा

## पृथ्वीस भारभूत

हाकारली शिडे मी
फुटके तशात तारू
अंधार दाटणारा
व्यर्थात साचणारा

भवती विवस्त्र क्रौर्य
परदेशी मी पथीक
डोळयात फाटलेला
आभाळरंगी फेस

हृदयास उंच खाली
नेतात क्षुद्र पाय
तू तार मार पाप्या
पृथ्वीस भारभूत !

## जन्मजड

आता तारे जड झाले
आता वारे जड झाले
स्वप्न पेलुन रात्र रात्र
डोळेसुद्धा जड झाले

क्षितीज आ वासुन आले
माझे पाऊल जड झाले
उगमाशीच प्राक्तनाने
अस्तित्वास गिळून टाकले

डोळ्यांमधील अश्रूंचे
गुडघाभर पाणी झाले
जन्मजड आयुष्य माझे
बघता बघता बुडुन गेले.

## अेक दिवस

असाहि अेक दिवस असतो
गुलाबाला काटेच दिसतात.
मनामधल्या पारंब्यांना
वटवाघुळें लटकत असतात.
फिरताफिरता पायामधली
वहाण माझी तुटून जाते
डोळ्यांमधली आकांक्षांची
अुनसावली हरवून जाते
गळून गेल्या घुंगुरांचा
नाद कानी येत राहतो
ओळखीच्या वळणावरती
रस्ता मी हरवून जातो
बुबुळांना पापण्यांचा या
पिंजरा फार बरा वाटतो
मणामणांच्या बेड्या घालुन
अंध दिवस सरकत असतो.

## पाणी

वेश्येची दुपार
किचकिचणारे डोळे
रुतणाऱ्या बरगड्या
सताड आयुष्य

डोळ्यांशी क्षण
घोंघावणारी चिलटे
आढ्याचे ओझे

या सर्व अस्तित्वाचे
अवजड डोळे फोडून
स्वप्नावर वाहणारे
आयुष्याचे राड पाणी

## सत्त्वहरण

कमरेत झुकलेले आभाळ
जेव्हा मला सामोरे येते
ढगांची लक्तरे सावरीत
इंद्रधनुष्य टेकवत टेकवत.
तेव्हा शेकडो चिमण्या
चिवचिवतात माझ्या उरात.
अश्रुंची लाज लकलकते
माझ्या बदामी हृदयात.
टिचभर देह अंथरावा
वाटेतल्या खाचखळग्यावर
असे अेक डोळा सांगतो.
दुसरा मात्र कोडग्यासारखा
पापण्यांची भिंत उभारून
मागे सर म्हणतो !
राज्यभ्रष्ट सम्राटासारखे
आभाळ संथ निघून जाते.
कमरेत झुकलेला मी
गच्च डोळे मिटून घेतो
पापण्यावरून ओघळणारा
अेक अश्रु मधेच थांबतो.

## शोध

व्यर्थ सुस्कारे टाकीत
जीव उदास करीत
कांही तरी अनामिक
आज दाटते मनात

जुनी खोल सारी दुःखे
मर्मी लागलेले शब्द
जुन्या आकांक्षा, ती स्वप्ने
आपोआप येती वर

नको नको म्हणत मी
केला होता अट्टाहास –
सारे विसरूनी जावे
पुन्हा नव्याने जगावे !

कात टाकणे माझीच
मला कधी न जमळे
भूतकालीन डोहात
भविष्यहि हरवले

आज शब्दांत दाटले
नरदेहाचे संचित
मिळे वेदनेला वाणी
दुःख होई सुख–रुप

## माझ्यात मी दूर दूर !

डोळ्यापुढे काळोखाची जहाजे
हिरव्या गवतात गर्द अंधार
रितेपणाचा पूर पूर.

व्याले आकाश जड तारे
हृदयावर उल्का कोसळणाऱ्या
मी धुक्यांत चूर चूर.

कोठे अंधार ? कोठे प्रकाश ?
कोठे धुके ? कोठे आभाळ ?
माझ्यात मी दूर दूर !

## विकल

हात अनोळखी होतात
तेव्हा स्वप्नेही अनोळखी वाटतात.
अभिलाषांचे
उन्हातील झाड होते.
सळसळणारे पोपटी.
शरीर कलेवर होते
उघड्या डोळ्यांचे.
उन्हातील झाड
डोळ्यात प्रतिबिंबित न झालेले.
विकल !

## एक कुणी

एक कुणी एक कुणी न
डोळ्यातुन उतरावे डोळ्यांनी
भिनत भिजत सहज तसे
कंच झाड पाण्याशी
बुजणारे शेलाटे
फडफडत्या पापणिसे
झुकले तरी अवघडून
ओठावर ओठ जसे
स्वप्नावस्थेत दंग
फुलणारे अपुल्याशी
पाझरत्या वर्तुळात !

## वय

म्हटले असते तर
तारे वेचून आणले असते
अशा वल्गनांचे वय

हितचिंतकांच्या
सावल्यांना सुध्दा झोडपले असते
अशा बेछूटपणाचे वय

दगडावर डोके आपटून
डोके फुटते, दगड नव्हे
हे न कळण्याचे वय.

काही न कळता
जखमांच्या लिपीतून
सारे काही उलगडण्याचे वय.

## क्षमा

या मातिमधि पाय रुजविले त्यांनी
या मातीला प्रणाम केला पहिला
मी मातीला लाथ मारली
मला जखडत्या
( कुणास ठाऊक आणि पोसत्या )
आणि वाकुनि प्रमाण केला पहिला आभाळाला

मला न माहित काय वाटले या मातीला
मी भेदरलो मला न माहीत
काय वाटले आभाळाला

आभाळाच्या उरात का पण विचित्र तगमग ?
अन् मातीचे हृदय भरोनि येई शिगोशिग !

## भय

मला भय वाटते......
कातिणीच्या घराचे
कोळ्याच्या जाळ्याचे
जाळयात गरगरणाऱ्या
लहानशा किड्याचे
सुया टोचल्याप्रमाणे
घुसणाऱ्या पायांचे
संज्ञा हरपावी तशा
बटबटीत डोळ्यांचे,
पाने झडलेल्या झाडांचे,
भिंतीवर हलणाऱ्या छायेचे
एकान्ताचे भान देणाऱ्या
लाखो पायांच्या गर्दीचे,
लाखो प्रश्न रोखणाऱ्या
अवजड एकान्ताचे,
याचे....त्याचे
तुमचे....माझे !

## बाधा

कातरवेळी लागतात
कणिकेचे दिवे
मनाच्या खोल कोनाड्यात
हालणाऱ्या आकारांच्या सावल्या
भिरभिरतात भिंतीवर
काजव्यांची लुकलुक उजळते
रातकिड्यांचे आवाज
टिकटिकतो क्षण
रिक्त अंधारडेऱ्यात
घुमतात सावल्या अंगात येऊन
डुबडुबते घागर
डोळ्यांच्या विहिरीत.
आणि मेंदुला लटकलेल्या
उलट्या पावलांना
फुटते किंकाळी !

## प्रतिबिंब

शिव्या हासडत गेलो याला त्याला
सात्विक संतापाच्या उंच शिखरावरून
साक्षात पशू
बेगडी वर्ख मानव्याचा लावलेले
संस्कृती बकबकणारे
दडले आहेत फुत्कारते साप
अंधाऱ्या यांच्या मनात
हे धरतात डूख
लसलसती यांच्या जिभा
भक्ष्य शोधीत
तोंडातून निघतात यांच्या शब्द
गोड चिकट खरवसासारखे
पण असते दुसऱ्या टोकाशी
खदखदत विष
गळाला लावतात आमिष
जारपुत्र !

पण कधी बसतो भरकटत
नकळत
झोपल्यावर जाणिवेचा कुत्रा

वासनेच्या भोवऱ्यात गरगरतो
हरपून संज्ञा
जत्रेतील पाळण्यात बसल्यासारखा
पण गतीलाही झीट येते
अचानक तुटतो पाळणा
मोडतात हाडे उतरते धुंदी
आणि कण्हताना जाणवते
शिव्या हासडत गेलो याला त्याला
सात्विक संतापाच्या उंच शिखरावरून
ते माझेच प्रतिबिंब आहे !

## दु:ख

अबोल असताना मी होतो
भिरभिरत्या डोळ्यांनी बोलत
शब्दांच्या पैल तिरिचे सगळे
नि:शब्दातुन अथांग सांगत

कोण्या एका छटेल वेळी
शब्दयोषिता समोर आल्या
सुरू जाहली भूलभुलावण
सुरू जाहले दु:ख सनातन

## वासना

या हृदयाइतक्या खोल खोल दरीत
मी पहात राहिलो
प्रत्येक पाकोळीचे भिरभिरणे
सापाचे सरपटणे
फुलांचे माना मोडून पडणे
आणि पक्ष्यांचे भयाकुल बरळणे

येथे एकदा चंद्र उतरला होता
तेव्हा त्याच्या पादुका स्थापल्या
अभिषेकासाठी मुंडन केलेला एक साधू
तेव्हाच मी पाहिला होता
अमृताच्या तळ्याकाठी एक मोर नाचत होता

त्यानंतर इथे खूप रान माजले
प्रत्येक दिवसाचे चंदनाचे झाड झाले
श्वासाश्वासांत वास घमघमला
मुंडित साधू पुढच्या जन्मी मोर झाला

## हे गाव

हे असे उध्वस्त गाव
आणि एथल्या निपुत्रिक राजाचा वाडा
मनामध्ये चरणारी गाढवे
आणि डोळ्यांवर लोंबणारी अरण्ये
किती दिवस भोवंडत आलो या गावात
शापित यक्षासारखा

हे गाव तसे सुवर्णाचे
गौर कांतीचे
स्वप्नात तरंगणाऱ्या दिव्यांचे
कसे मोडकळीला आले मृत्युशय्येवर
म्हातारीने आचके द्यावे तसे
वासनांचे लोंढे घालून गेले वेढा
द्वेषाचे तिरस्काराचे
आणि हृदयविंधत्या प्रेमाचे
किती भोवरे गरगरले.

आज असे हे निष्पर्ण
ओसरून गेलेल्या तारुण्यासारखे
मध्येच मद्यपानात दचकून जाग यावी तसे
हे सनातन गाव
आणि यावरून झेपावत गेलेली
चाळीस पाखरे
निमिषमात्रात
साक्षात्कारी पुरुषाच्या डोळ्यांपुढून
‘ वस्तू ’ हरपावी तशी !

## आत्मा

हा डोळ्यांपुढील तिळा एवढा राजवाडा
ज्यात राहातो विश्वंभर सृष्टिकर्ता
पंच महाभूतांतील दृष्यातीत
आत्मा.

जनन मरणाचे शेकडो उंबरठे
देहांची बेगडी मखरे
जरेने उडालेले रंग
दु:खाच्या लक्ष रुपांच्या
पल्याड नेणारा
आत्मा.

आनंदाचे डोही आनंद तरंग निर्मिणारा
साक्षात्कार पथाच्या पहिल्या
पायरीवरचा वाटाड्या

हा केवळ परब्रह्म
ऋषिमुनींना वेड लावणारा
गुरु कृपेने उचंबळणारा
देवस्वरुपी झरा
आत्मा.

## आभाळ पांघरावे

आभाळ पांघरावे
आणि जळांत पहावे
इंद्रधनुष्यावर
दु:ख अडकवुन ठेवावे.

मग जळ व्हावे
आभाळ उराशी ओढून घ्यावे
इंद्रधनुष्य जवळ आले की
आपले दु:ख मागुन घ्यावे.

त्याच्या सप्तरंगांतून
सात जन्म चालत राहावे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४३६
२३३८४
काव्य २५।१२।८९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023374
REFBK-0023374

## तिसरा रस्ता

कोलमडलेला एक माणूस
पुन्हा एकदा ताठ झाला.
पाठीमधला बाक मात्र
जन्मभर कायम राहिला.

कोलमडलेला एक माणूस
धडपडत उभा राहिला.
ठणकणाऱ्या डोळ्यांनी
आभाळांत पहात राहिला.

कोलमडलेला एक माणूस
पुन्हापुन्हा कोलमडत राहिला.
दोन पायांमधून त्याच्या
तिसरा रस्ता वहात गेला.

‘ स्व ’ च्या माध्यमातून जीवनाचा घेतलेला शोध असे या कवितेचे मुख्यतः स्वरूप आहे. या शोधामागे मूलतः एक वृत्तिगांभीर्य आहे.

ही कविता भावानुभूतीशी तन्मय होत असताना कोठे तरी अकस्मात तटस्थ, अलिप्त होऊन आपली प्रतीती निष्ठूरपणे ताजव्यात तोलत आहे असे वाटते. ती चिंतनशील प्रवृत्तीची आहे. साहजिकच भावनांच्या कल्लोळापेक्षा विचारगर्भ भावानुभवातच ती रमते.

ती तृप्त, प्रसन्न इंद्रियसंवेद्य निसर्गरूपे रेखाटते; सफल आणि विफल प्रेमानुभव शब्दांकित करते; सृजन प्रक्रियेच्या गूढाचे तिला आकर्षण आहे; मानवी अस्तित्वाचे क्षुद्रत्व आणि क्षणभंगुरत्व यामुळे ती वारंवार अगतिक होते. आणि अतींद्रिय अनुभूतींकडेही मोहरा वळविते. प्रतिमांचा तिला सोस नाही. विचारगर्भ भावानुभव गोचर करण्यावरच तपस्व्याच्या एकाग्रतेने तिची दृष्टी खिळलेली आहे. कलावंताच्या मार्गावरील सर्व प्रलोभने टाळून ती एका तिसऱ्या रस्त्याने निघालेली आहे. त्या वाटचालीची ही विविध रूपे !